# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume IV
Issue XII

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

December 2017


A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos


Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in

Email : ijmms14@gmail.com


Scanned with OKEN Scanner

TITLE: INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-IV, ISSUE-XII

December -2017

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | कृषी, आपत्ती व्यवस्थापन व औद्योगिकरणाचा पाया भक्कम करणारा नेता मा. शरदचंद्र पवार | डॉ. रमेश एस. देसाई | १५४-१५७ |
| ३७ | शरद पवारांनी कृषी क्षेत्रासंबंधी केलेले प्रयोग | डॉ. विलास पाटील | १५८-१६१ |
| ३८ | 'अॅड-राम कांडगे लिखित' लोकनेते शरदरावजी पवार या ग्रंथाचे एक अवलोकन आणि आकलन | संतोष पद्माकर पवार | १६२-१६४ |
| ३९ | राजकीय क्षेत्रातील शरद पवारांचे योगदान | प्रा. सतीश उढाण | १६५-१६७ |
| ४० | आदरणीय शरदचंद्र पवारांचे सहकारातील योगदान | प्रा. शरदकुमार उत्तम शेटे | १६८-१७२ |
| ४१ | प्रभावी व अनुभवी नेतृत्व: शरद पवार | प्रा. ओंकार नरेंद्र केने | १७३-१७५ |
| ४२ | महिला सबलीकरणामध्ये शरद पवार यांचे योगदान | प्रा. ज्ञानेश्वर खोडवे | १७६-१७९ |
| ४३ | शरदचंद्र पवार यांचे कृषिक्षेत्रातील योगदान | प्रा. लोहगावकर जयश्री | १८०-१८४ |
| ४४ | आधुनिक भारताच्या विकासात शरदपवार यांचे योगदान: विशेष संदर्भ महाराष्ट्राच्या राजकारणाची अभिजन चौकट | राजकुमार सुरवसे | १८५-१८६ |
| ४५ | सकलजनवादी नेतृत्व शरद पवार | वैशाली प्रकाश पवार | १८७-१९१ |
| ४६ | पुलोद सरकार आणि शरद पवार यांची भूमिका | प्रा. सुपेकर वैशाली प्रशांत | १९२-१९४ |
| ४७ | मा. शरद पवार: व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्ये आणि नेतृत्व शैली | प्रा. सुनंदा हेळकर | १९५-१९७ |
| ४८ | शरद पवार यांची सामाजिक न्यायवादी भूमिका - विद्यापीठ नामांतर संदर्भात | डॉ. निशा सिताराम मोरे | १९८-२०२ |
| ४९ | कृतीशील व्यक्तिमत्व:शरदराव पवार साहेब | चंद्रकांत पांडूरंग सरगर | २०३-२०४ |
| ५० | बहुआयामी लोकनेता: शरद पवार | डॉ. मीना ठाकूर | २०५-२०६ |
| ५१ | शरद पवारांचे महिला सक्षमीकरणात योगदान | प्रा. राजकुमार बबन रिकामे | २०७-२१० |
| ५२ | महिला सक्षमीकरणास शरद पवारांचे योगदान | प्रा. माधुरी सावंत | २११-२१२ |
| ५३ | शरदचंद्र पवार यांचे महिला सबलीकरण धोरण | प्रा. भाऊसाहेब खंडु सांगळे | २१३-२१४ |




Scanned with OKEN Scanner

ISSN (Print): 2394-207X
Impact Factor: 4.205
VOLUME-IV (XII)
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# पुलोद सरकार आणि शरद पवार यांची भूमिका

प्रा. सुपेकर वैशाली प्रशांत
राज्यशास्त्र विभाग
अ.आ. कॉलेज, मंचर

पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकारणात गेली अनेक वर्षे आपल्या कार्याचा ठसा उमटविला, ते शरद पवार देशाच्या राजकारणात एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून त्यांचे राजकीय मूल्य कदाचित आहे. समकालीन संदर्भात जरी शरद पवारांचे स्थान राजकीय वर्तुळात मागे पुढे होत असले तरीही आपल्या मुत्सद्दी भूमिकांमधून त्यांनी आपले आणि आपल्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व जपले आहे. चार वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या शरद पवारांचा आणखी एक महत्त्वाचा गुणविशेष असा की, त्यांनी राजकारणातल्या सत्तेच्या विविध पदांवर असताना साहित्य, कला, विज्ञान, क्रिडा, उरयोग, सामाजिक संस्था अशा कितीतरी संस्थांमध्ये आपल्या कार्याचे योगदान दिले आहे.

प्रस्तुत लेखामध्ये शरद पवारांचा 'पुरोगामी लोकशाही दल' शासनामध्ये काय योगदान होते, याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) शरद पवार यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्राच्या राजकारणातील १९७८ मध्ये घडलेल्या राजकारणाचा अभ्यास करणे.
३) शरद पवार यांच्या विधानसभा कार्याचा थोडक्यात आढावा घेणे.
४) पुलोद सरकारने स्वीकारलेल्या धोरणांचा सारांश आढावा घेणे.

**१.शरद पवार आणि महाराष्ट्र विधानसभा :** १९६७ च्या राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये ते बारामती मतदारसंघातून विजयी झाले.महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचा प्रवेश १९६२ साली झाला होता. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे अत्यंत दूरदृष्टीचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी युवक कॉंग्रेसमध्ये त्यांना समाविष्ट करून घेतले आणि २४ व्या वर्षी ते महाराष्ट्र राज्य युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. १९६७ ते १९७२ अशी पाच वर्षे त्यांनी आमदार म्हणून कार्य केले. १९७२ च्या वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात गृह, प्रसिद्धी या महत्त्वाच्या खात्याच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी घेतली. १९७४ च्या वसंतराव नाईक साहेबांच्या मंत्रीमंडळातील कॅबिनेटमंत्री पद, १९७५ साली शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात कृषीमंत्री पद त्यांनी सांभाळले. विधानसभा सदस्य म्हणून काम करताना महाराष्ट्रातील शेती, शेतीला पूरक उद्योगधंदे, सहकार, शेतीचा पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, शिक्षण, सामाजिक न्यायाची शासनाची भूमिका या विषयावर त्यांनी माहिती करून घेतली. राज्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी अधिकाऱ्यांना आपली भूमिका, आपले अधिकार व जनतेचे हित यांचे भान ठेवून त्यांचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी दिले.

महाराष्ट्राचे कृषीमंत्री झाल्यानंतर दुष्काळ पिडीत शेतकऱ्यांना उत्पादन हमी योजनेच्या माध्यमातून मदत केली. शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे ठराविक हमखास उत्पन्न मिळाले पाहिजे. कृषी शास्त्रज्ञांकडून त्यांनी विविध पिकांच्या उत्पादनाची हमी मागितली. गहू, ज्वारी यांचे सुधारित किंवा संकरित बियाणे वापरले व योग्य ती काळजी घेतली तर विशिष्ट प्रमाणात उत्पादन मिळाले पाहिजे, अशी ती योजना होती. तेव्हापासून त्यांनी उत्पादकतेवर भर दिला. शेती विकासाच्या अनेक योजना त्यांनी सुरू केल्या. संकरीत वानाच्या पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यास प्रोत्साहन दिले. हायब्रीडच्या शेती क्षेत्रात नवे पर्व निर्माण केले व राज्यात हरितक्रांतीचा पाया घातला.

राज्यात चार वेळा मुख्यमंत्री झालेले शरद पवार हे महाराष्ट्रात तब्बल सहा वर्षे विरोधी पक्षनेते होते. या सहा वर्षात विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी अत्यंत प्रखरपणे भूमिका वठवली. जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कामगार आघाडी, मार्क्सवादी कम्युनिस्ट, आर.पी.आय. या सर्व डाव्या विचारांच्या पक्षांची त्यांनी एकजूट केली आणि सर्व पक्षांना विश्वासात घेवून जनतेच्या निरनिराळ्या प्रश्नांवर ते लोकशाही मार्गाने चळवळी उभारीत. ९ जून १९८० ला बॅ. अंतुले मुख्यमंत्री झाले. त्यानंतर नागपूरच्या विधानमंडळावर शरद पवार यांनी जी शेतकरी दिंडी आणली. ती दिंडी इतकी भव्य होती की, अखिल भारतीय



Scanned with OKEN Scanner